# रोहयो व जनसंघटनांची स्त्रीवादी कृतिशीलता
## श्रम, मत्ताधिकार व हिंसा यांच्या संदर्भात

अनुरेखा चारी*

*रोहयोच्या प्रकल्पस्थळी स्त्रीमजुरांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती असली तरी त्यामुळे रोहयो 'स्त्रियांसाठीचा कार्यक्रम' ठरत नाही. रोहयोने आपत्तीसमयी ग्रामीण अकुशल स्त्री श्रमशक्तीला रोजगार पुरविला; परंतु आजही या स्त्रिया रोहयोवर उत्पन्नासाठी अवलंबून राहतात, हे रोहयोचे अपयश होय. उलट, रोजगार हमीभोवती स्त्रियांना संघटित करून, जनसंघटनांनी त्यांच्यात स्त्रीवादी जाणिवेचे स्फुल्लिंग पेटवल्यामुळेच रोहयोला तिची बहुचर्चित 'स्त्री सन्मुख' प्रतिमा लाभली.*

### प्रस्तावना

१९७७ मध्ये कायद्याच्या[१] रूपात अस्तित्वात आलेली रोजगार हमी योजना (रोहयो) ही 'स्त्री सन्मुख'[२] असल्याचा निर्वाळा अनेक अभ्यासकांनी दिला आहे [दांडेकर व साठे १९८०; दातार १९८७, १९९०; आचार्य १९९०; कृष्णराज २००४]. देव (१९८५) यांच्या मते रोहयो हा 'स्त्रियांसाठी कार्यक्रम' आहे कारण तो ५१ टक्के [दांडेकर १९८२] वा ४५ ते ६४ टक्के [दातार १९८८] ग्रामीण स्त्री मजुरांना रोजगार पुरवतो. याचाच पुनरुच्चार आचार्य (१९९०) करतात. त्यांच्या मते रोहयोत सरासरी ४० टक्के कामगार स्त्रिया असल्यामुळे, रोहयोच्या रोजगारभरतीत त्यांना कोणताच लिंगभावाधारित भेदभाव आढळला नाही. रोहयो स्त्रियांच्या गरजांप्रती संवेदनशील असल्यामुळे या योजनेकडे स्त्रियांचा ओढा असतो, या तर्कावर वरील निष्कर्ष आधारलेले आहेत.

रोहयो कायद्याअंतर्गत श्रमशक्तीवरील एकूण खर्चापैकी ६० टक्के खर्च हा अकुशल श्रमशक्तीवर व्हावयास हवा, व ग्रामीण भागांत अधिकतर अकुशल श्रम स्त्रिया पुरवत असल्यामुळे, रोहयो 'लिंगभाव सन्मुख' असल्याचे मत कृष्णराज व इतर (२००४) मांडतात. तसेच, अकुशल कामगारांचे प्रशिक्षण हा रोहयोचा एक मूलभूत उद्देश असला पाहिजे, असेही या कायद्यात म्हटले आहे. परंतु माझ्या क्षेत्रकार्यातील निरीक्षणांनुसार, रोहयो अकुशल स्त्रियांना प्रशिक्षित करण्यात असफल ठरली आहे. तीन दशकांनंतरही स्त्रिया रोजगार व उत्पन्नासाठी ह्या योजनेवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत. म्हणून, रोहयोच्या प्रकल्प स्थळी स्त्रियांची लक्षणीय उपस्थिती असण्यास चांगले लक्षण मानणे चुकीचे ठरेल. उलटपक्षी, अकुशल कामगार म्हणून श्रमबाजारातील स्त्रियांच्या स्थानात रोहयोमुळे कोणताही फरक पडलेला नाही. रोहयो कामागारांत स्त्रियांची मोठी संख्या असल्यामुळे रोहयो 'स्त्रियांसाठीचा कार्यक्रम' ठरत नसून, या योजनेत ग्रामीण गरिबांच्या सक्षमीकरणाची क्षमता असल्यामुळे ही योजना लिंगभाव सन्मुख बनते, असा माझा निष्कर्ष आहे.

ह्या निबंधात मी १९७० ते १९९०च्या दशकांमध्ये रोजगार हमीच्या संदर्भात स्त्रियांच्या सबलीकरणासाठी तीन संघटनांनी केलेले कार्य तपासले आहे. माझ्या शोधनासाठी मी खालील प्रश्न विचारात घेतले: १) या संघटन प्रक्रियेचे सामाजिक-राजकीय व आर्थिक संदर्भ कोणते? २) या मोहिमेसाठी संबंधित संघटनांनी कोणती कार्यपद्धती स्वीकारली? ३) या चळवळींमुळे लिंगभावविषयीचे कोणते प्रश्न प्रामुख्याने पुढे आले? ४) स्त्रियांची संघटन प्रक्रिया व 'रोजगार हमी' यांतील नेमके नाते कोणते?

रोहयो बाबतच्या माझ्या विश्लेषणास हेरिंग आणि एडवर्डस् (१९८३) यांच्या मांडणीचा आधार आहे. त्यांच्या मतानुसार रोहयो अंतर्गत असलेले निर्णयप्रक्रियेचे अनेक स्तर व अंमलबजावणीच्या अनेक पायऱ्यांमुळे ही योजना आपापत: परिवर्तनवादी योजना ठरत नाही. परंतु रोहयोत ग्रामीण गरिबांना संघटित करण्याची क्षमता असल्यामुळे 'सामूहिक कृती'साठी ती खचितच एक सुरुवात ठरू शकते. या निबंधात हाच निष्कर्ष स्त्रियांच्या संदर्भात पडताळून पाहण्याचा मी प्रयत्न केला आहे. वरील प्रश्नांची उकल करण्यासाठी स्त्रियांचा राजकीय सहभाग व भारतातील स्त्रीवादी चळवळीची वाढ तसेच शासनाने कार्यान्वित केलेल्या विकास योजना व महिलांचे सक्षमीकरण यांतील नातेसंबंधाचे अध्ययन व विश्लेषण केलेल्या अभ्यासकांच्या व कार्यकर्त्यांच्या लिखाणाचा मी आधार घेतला आहे [ओमव्हेट १९७७, १९९३; सेन १९९०; गांधी व शहा १९९२; कुमार १९९३].

ओमव्हेट (१९७७, १९९३), गांधी व शहा (१९९२), कुमार (१९९३) यांच्या मते १९७०च्या दशकाच्या उत्तरार्धातील स्त्री चळवळ ही स्त्रियांची स्त्रियांसाठी स्त्रियांनी चालवलेली चळवळ होती. ती पक्ष व त्यांच्या जनसंघटनांपासून स्वायत्त होती. या स्त्री संघटना शहरी, शिक्षित मध्यमवर्गीयांनी स्थापन केल्या होत्या व जरी त्यांच्यामध्ये विचारसरणात्मक मतभेद असले तरी स्त्रीवादी जाणीव रुजवणे हे त्या सर्वांचे समान ध्येय होते. या संघटनांची स्त्रीवादी जाणीव लिंगभावाधारित भेदभावाच्या विश्लेषणांतून उद्भवलेली होती व भारतीय समाजव्यवस्थेची स्त्रीवादी दृष्टिकोनातून चिकित्सा करणे, असे त्याचे स्वरूप होते. तसेच, या अभ्यासकांच्या मते १९७०च्या दशकाच्या उत्तरार्धातील स्त्री चळवळ हा भारतीय स्त्री

* संशोधिका, समाजशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे.

चळवळीतला तिसरा टप्पा होता. पहिला टप्पा स्वातंत्र्य चळवळीचा तर १९६०च्या दशकाच्या उत्तरार्धात व १९७०च्या दशकाच्या सुरुवातीला महाराष्ट्रामधील जनचळवळीत स्त्रियांनी बजावलेली प्रमुख भूमिका हा तिचा दुसरा टप्पा होता.

सेन (१९९०) यांच्या मते स्त्री चळवळीच्या दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यांमध्ये फरक करणे अप्रस्तुत ठरते कारण स्त्रीवादी जाणिवेची वाढ व पितृसत्ताकतेची चिकित्सा ही काही फक्त स्त्रियांनी नेतृत्व केलेल्या चळवळींतूनच उद्‌भवते असे नाही. उलट, स्त्री व पुरुषांचा संयुक्त सहभाग असलेल्या महाराष्ट्रातील १९६० व १९७०च्या दशकांतील चळवळींमध्ये लिंगभावविषयक मुद्दे हाताळले गेले होते. या चळवळींमध्ये पुरुषांचा सहभाग व नेतृत्व असले तरी त्यात स्त्रिया स्त्री-प्रश्नासाठी स्वतंत्र 'स्थान' निर्माण करू शकल्या. तसेच, १९७०च्या दशकाच्या उत्तरार्धापासून या जनचळवळीत लिंगभावविषयक प्रश्नांना हातळणारे स्वतंत्र स्त्री कक्ष अस्तित्वात आले. या अर्थी, या जनचळवळींनी स्त्रीवादी जाणिवेच्या उत्क्रांतीमध्ये महत्त्वाची भूमिका वठवली होती.

या स्त्रीवादी जाणिवेचे स्वरूप तपासताना अगरवाल (१९८९, १९९४) तिच्याकडे प्रामुख्याने भौतिक गरजांच्या संदर्भात पाहतात. त्यांच्या मते पितृसत्ताकतेमधील लिंगभावाधिष्ठित आर्थिक विषमतेला वाचा फोडणे हे स्त्री चळवळीचे व्यवच्छेदक लक्षण ठरले. म्हणजे, भेदभाव व पितृसत्ताकतेअंतर्गत स्त्रियांचे स्थान निर्धारित करणाऱ्या आर्थिक परिस्थितीच्या संदर्भातच कुटुंबांतर्गत लिंगभावाधारित भेदभाव व हिंसा यांचा परामर्श घेतला जाऊ शकतो, अशा याचा अन्वयार्थ निघतो.

वरील मांडणींच्याआधारे मी खालील निष्कर्षांप्रत पोचले : एक, १९६०च्या दशकाच्या उत्तरार्धातील व १९७०च्या दशकाच्या पूर्वार्धातील महाराष्ट्राच्या ग्रामीण भागांतील जनचळवळींमध्ये स्त्रियांचा व पुरुषांचा राजकीय सहभाग होता; दोन, या चळवळींमध्ये विविध जाती-वर्गातील स्त्रियांना स्वत:ला अभिव्यक्त करण्यासाठी व राजकारणात सहभागी होण्यासाठी 'अवकाश' मिळाला व त्यातून त्यांनी लिंगभाव संबंधित विषयांना वाचा फोडली; तीन, शहरी स्त्री कार्यकर्त्यांनी ग्रामीण स्त्रियांशी हातमिळवणी करून एक अखिल भारतीय युती घडविण्याचा प्रयत्न केला; चार, लिंगभावविषयक प्रश्नांमध्ये स्त्रियांच्या भौतिक गरजा व त्यांचा कुटुंबांतर्गत भेदभावांवर होणाऱ्या परिणामांना अधोरेखित केले गेले.

विकास कार्यक्रमांतून स्त्रियांचे सक्षमीकरण साधण्याच्या चर्चेत वरील सर्व मुद्दे प्रस्तुत ठरतात. धोरणकर्ते व काही स्त्री कार्यकर्त्यांच्या मते स्त्रियांच्या किमान मूलभूत गरजांची काळजी घेतली गेली तर स्त्रिया सक्षम बनतील. या आधारे, सरकारने विकास कार्यक्रमांमार्फत या गरजा भागवाव्यात, असे त्यांचे म्हणणे असते. या संदर्भात मोझर यांनी (१९८९: १८००-१८०४) दोन प्रकारच्या हितसंबंधांमध्ये — 'व्यावहारिक' (practical) व 'व्यूहरचनात्मक' (strategic) — केलेला फरक महत्त्वाचा ठरतो. मोझर यांच्या मते स्त्रियांसाठीचे अधिकतर विकास कार्यक्रम हे स्त्रियांच्या व्यावहारिक गरजांच्या पूर्तीसाठी आखले जातात. परंतु अशा विकास कार्यक्रमांना मर्यादित यशच प्राप्त होते. या पार्श्वभूमीवर, मी शासन पुरस्कृत रोहयोचे विश्लेषण केले आहे. या योजनेमध्ये, मोझर म्हणतात त्याप्रमाणे, वेळेवर समान वेतन, स्वच्छता आणि पिण्याची पाण्याची उपलब्धता यांसारख्या 'व्यावहारिक' गरजांचा अंतर्भाव आहे. परंतु, जेंव्हा डाव्या व स्त्रीवादी संघटना स्त्रियांना सामूहिक कृतीसाठी प्रवृत्त करतात तेंव्हाच ह्या 'स्त्री सन्मुख' तरतुदी अंमलात आणल्या गेल्याचे आढळते. या उलट, १९६०च्या दशकाच्या उत्तरार्धात सुरू झालेल्या चळवळींमध्ये स्त्रीविषयक 'व्यावहारिक' व 'व्यूहरचनात्मक' गरजांची सांगड घातली गेल्याचे निदर्शनास येते.

वरील चर्चिलेल्या मुद्यांचा तपास घेण्यासाठी मी दोन कालावधी निवडले. १९६९ ते १९७५ या पहिल्या कालखंडासाठी मी पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्याच्या जिल्ह्यांतून भूमिहीन व लहान आणि मध्यम शेतकऱ्यांना संघटित करणारी लाल निशाण पक्षाची ग्रामीण कामगार संघटना, 'महाराष्ट्र राज्य शेतमजूर परिषद' (यापुढे परिषद) व धुळे जिल्ह्यातील आदिवासींना संघटित करणारी स्वायत्त डावी राजकीय संघटना, 'श्रमिक संघटना', या दोन संघटनांची निवड केली. स्त्रियांच्या संघटित दबावामुळे स्त्रियांच्या शोषणासंबंधीचे आर्थिक मुद्दे कसे मांडले गेले व रोहयोची त्या दृष्टिकोनातून कशा प्रकारे अंमलबजावणी झाली, याचा मी ऊहापोह केला आहे. दुसरा कालावधी म्हणून मी १९७०च्या दशकाच्या उत्तरार्धाची व १९८०च्या दशकाच्या पूर्वार्धाची निवड केली. येथे मी सांगली जिल्ह्यातील भूमिहीन व विस्थापित गिरणी कामगारांना संघटित करणाऱ्या 'मुक्ती संघर्ष' व 'स्त्री मुक्ती संघर्ष' या स्वायत्त डाव्या संघटनांनी रोजगार हमीसाठी केलेल्या स्त्रियांच्या संघटन प्रक्रियेतून स्त्रीवादी प्रश्न कसे हाताळले गेले याचा धांडोळा घेतला आहे.

या अभ्यासाच्या आरंभी मी रोहयो व स्त्री प्रश्नांवरील पुस्तकं व लेखांसारख्या दुय्यम स्त्रोतांचा वापर केला व नंतर वृत्तपत्रं, शासकीय दस्तावेज व संबंधित संघटनांची पत्रकं व पत्रं यांसारख्या प्राथमिक स्त्रोतांचा आधार घेतला. तसेच, रोहयो कामगार, सरकारी अधिकारी व कार्यकर्त्यांच्या मुलाखतीतूनही माहिती गोळा करण्यात आली. हा लेख मी तीन भागांत विभागला आहे व यांतील प्रत्येक विभागात एका संघटनेचे कार्य चर्चिले आहे. अखेरच्या समारोपात मी माझे निष्कर्ष मांडले आहेत.

## १

या विभागात मी परिषदेच्या नेतृत्वाखाली अहमदनगर (पश्चिम महाराष्ट्र), औरंगाबाद, परभणी, उस्मानाबाद (मराठवाडा), व जळगांव (उत्तर महाराष्ट्र) जिल्ह्यांतील स्त्रियांच्या संघर्षाचा आढावा घेतला आहे. प्रमुख डाव्या पक्षांपासून स्वतंत्र व शहरी औद्योगिक कामगारांमध्ये पाया असलेल्या लाल निशाण पक्षाने शहरी व ग्रामीण श्रमिकांची वर्गीय युती साधण्यासाठी १९७१ मध्ये अहमदनगर जिल्ह्यात परिषदेची स्थापना केली. सुरुवातीला ग्रामीण भागातील गाव व जिल्हा स्तरावरील कोतवाल, जिल्हा परिषदांतील

कर्मचारी यांसारख्या सरकारी अधिकाऱ्यांच्या व बांधकाम कामगारां-सारख्या इतर कामगारांच्या कामगार संघटना स्थापन करण्यावर परिषदेने भर दिला (*ग्रामीण श्रमिक,* जून १५, १९६७). अवर्षणामुळे जेंव्हा भूमिहीन व लहान आणि मध्यम शेतकरी हवालदिल झाले त्यावेळेस परिषदेने त्यांना संघटित केले. सरकारने मदतकार्य स्थळी अशा कामगारांना काम दिल्यावर परिषदेने त्यांच्या कामाच्या ठिकाणी चांगल्या व्यवस्थापनाची मागणी केली. स्त्री-पुरुषांना समान वेतन व पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि पाळणाघर यांसारख्या शहरी संघटित कामगारांना उपलब्ध असलेल्या सुविधांचा या मागण्यांत समावेश होता. या मागण्यांद्वारे परिषदेने लिंगभावाधिष्ठित श्रमविभागणीच्या मुद्याला अग्रभागी आणले. यासोबत, अवर्षण निवारण कार्यक्रमाला कायमस्वरूपी रोजगार हमी कार्यक्रमात रूपांतरित करावे, अशी परिषदेची तिसरी महत्त्वाची मागणी होती. 'मागेल त्याला काम' या घोषणेभोवती परिषदेने कष्टकऱ्यांना संघटित केले व या मागणीद्वारे 'कामाची उपलब्धता' हा दुष्काळ निवारण केंद्रावर काम करणाऱ्या सर्वांचा कायदेशीर हक्क बनला (*ग्रामीण श्रमिक*, मार्च १०, १९७३).

ही संघटन प्रक्रिया जाणून घेण्यासाठी १९६०च्या दशकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रातील कृषी अर्थव्यवस्थेची स्थिती समजून घेणे आवश्यक आहे. ब्रह्मे व उपाध्याय (१९७९, २००४) यांच्या मते महाराष्ट्राच्या इतर प्रदेशांच्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्रात जमीन सुधारणा कार्यक्रमाला अधिक यश मिळाले व अनेक मराठा-कुणबी लहान व मध्यम शेतकऱ्यांना त्याचा लाभ झाला. १९७०च्या दशकाच्या सुरुवातीस पडलेल्या दुष्काळामुळे राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडले. राज्याच्या तेंव्हाच्या ५० दशलक्ष लोकसंख्येपैकी १५-३० दशलक्ष लोकसंख्येला या विपत्तीची झळ बसली [लॅडेजिनस्की १९७९; ओमव्हेट १९७५; ड्रेझ १९९५]. ग्रामीण भागांत अन्नधान्य, पिण्याचे पाणी, वैरण व रोजगाराच्या संधींचा तीव्र तुटवडा जाणवल्यामुळे अनेकांनी शहरांकडे स्थलांतर केले [सुब्रह्मण्यम् १९७५]. सतत तीन वर्षांच्या अवर्षणामुळे १० हेक्टर जमीनधारकांसहित समाजातील सर्व घटकांना रोजगारासाठी दुष्काळ निवारण केंद्रांवर नाव नोंदवणे भाग पडले [सुब्रह्मण्यम् १९७५].

अवर्षणग्रस्त परिस्थितीमुळे अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली व महागाई वाढली, ज्याचा परिणाम ग्रामीण महाराष्ट्रातील लिंगभावाधारित श्रमविभागणीवरही झाला. सेन (१९९७) यांच्या मते पारंपरिकरीत्या कौटुंबिक श्रमासोबत बिगर-कौटुंबिक श्रमाच्या आधारे चालणाऱ्या पितृसत्ताक कुटुंबांमध्ये भारतातील ग्रामीण उत्पादनाचे खाजगीकरण झालेले आहे. अशा कृषिव्यवस्थेत जमीनधारक वर्गातील स्त्रियांना चार भिंतीआड ठेवून त्यांच्या श्रमाच्या वापर कुटुंबाच्या उत्पादक व पुनरुत्पादक गरजांसाठी करून घेण्यासाठी, व खासकरून अपत्यांची पितृवांशिकता सुरक्षित ठेवण्यासाठी, स्त्रियांच्या लैंगिकतेची राखण केली जाई. यामुळे, स्त्री मजूर त्यांच्या घराजवळ किंवा जेथे त्यांच्या कुटुंबातील वा समुदायातील इतर स्त्री-पुरुषांसोबत काम मिळेल अशाच ठिकाणी राबताना दिसतात. परंतु, ओमव्हेट (१९७७)[३] यांच्या मते, महाराष्ट्रात परिस्थिती काहीशी वेगळी होती. मराठा पुरुष जरी आपल्या स्त्रियांना आडपडद्यात ठेवत व पितृसत्ताकतेच्या कडक नियम व निर्बंधांद्वारे स्त्रियांचा वावर मर्यादित करत, तरी कुणबी स्त्रिया मात्र इतरांच्या शेतांवर शेतमजूर म्हणून बऱ्याचदा राबायला जात, असे ओमव्हेट प्रतिपादतात.

अवर्षणामुळे ग्रामीण स्त्रियांना त्यांच्यासाठी व त्यांच्या गुरांसाठी पिण्याचे पाणी व वैरण गोळा करण्यासाठी दूरवर तर जावे लागेच; तसेच, कुटुंबातील पुरुषांचे शहरांकडील व जेथे दुष्काळ निवारण केंद्रे असतील अशा अन्य गावांकडील वाढत्या स्थलांतरामुळे या स्त्रियांना कुटुंबाच्या निर्वाहासाठी रोजगाराच्या शोधात बाहेर पडावे लागले. अशा परिस्थितीत, जमीनधारक मराठा वर्गातील स्त्रियांचे घराआड राहणे अशक्य बनले. रोजंदारीच्या शोधात मराठा स्त्रियांना घराबाहेर पडावेच लागले. दुष्काळ निवारण केंद्रांवरती मराठा स्त्रियांच्या व्यापक उपस्थितीचे सरकारी अधिकारी व कार्यकर्त्यांना 'आश्चर्य' वाटले. महसूल व वनखात्याचे सचिव व्ही. सुब्रह्मण्यम् हे दुष्काळी परिस्थितीवरील आपल्या अहवालात म्हणतात,

> २५ हेक्टरपेक्षा अधिक जमीनमालकी असलेल्या मराठा शेतकऱ्यांच्या बायका, मुली व सुना कामाची मागणी करत होत्या (१९७५:४३२).

१९७० पासून अशा निवारण केंद्रांवर कार्यरत असलेल्या परिषदेने स्त्रीमजुरांच्या हक्कांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरतील अशा मागण्या केल्या. प्रारंभी परिषदेने स्त्री-पुरुषांच्या समान कामाला समान दाम देण्याची मागणी केली. पुरुषांना अडीच रुपये आणि स्त्रियांना दोन रुपये या वेतनातील भेदभावाविरुद्ध त्याने आवाज उठवला. स्थानिक अधिकारी पुरुषांना माती खाणायला तर स्त्रियांना माती वाहायला सांगत व त्याआधारे वेतनामधील फरकाचे समर्थन करीत. परिषदेने माती वाहणे हेसुद्धा कष्टप्रद काम असल्याने स्त्रियांना समान वेतन लागू व्हावे, ही मागणी लावून धरली. लिंगभावाधारित श्रमविभागणीत स्त्रियांची कामे 'कमी' प्रतीची ठरवून त्यांस कमी वेतन देऊन सरकारी अधिकारी लैंगिक श्रमविभागणीला बळकटी देत होते.

परिषदेने 'मागेल त्याला काम' व 'कामाला योग्य दाम' या घोषणा देत, प्रथमच महाराष्ट्रातील ग्रामीण बेरोजगारांसाठी कायमस्वरूपी कामाची मागणी केली. ह्या मागणीतूनच 'आश्वासित रोजगारा'ची संकल्पना साकारली, जिचे नंतर १९७७ मध्ये रोहयो कायद्यात रूपांतर झाले. यापूर्वी १९६५ मध्ये सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यात असाच एक उपक्रम प्रायोगिक स्तरावर राबवला गेला होता. परिषदेने ही कल्पना सर्व ग्रामीण मजुरांना लागू व्हावी असा आग्रह धरला व अल्प काळातच या मागणीला मोठा जनाधार मिळाला. अवर्षणावरील १९७५ मधील सरकारी अहवाल नोंदवतो की 'सर्वांना काम' या संकल्पनेकडे

> मजूर 'हक्क' म्हणून बघत, ज्याआधारे महाराष्ट्रात सर्वत्र लाखो गरीब पुरुष व (खासकरून) स्त्रिया उच्च पदस्थ अधिकाऱ्यांकडे त्यांच्या

मागण्या पोचविण्यासाठी गरज पडल्यास एखाद्या अधिकाऱ्याची जीप थांबवण्यास, गट मुख्यालयाला घेराव घालण्यास किंवा सरपंचावर दबाव आणण्यास मागेपुढे पाहत नसत [सुब्रह्मण्यम् १९७५:१८९].

दुसरीकडे, परिषदेने अन्नधान्याच्या वाढत्या किंमती लक्षात घेऊन मजुरांना धान्यरूपात वेतन देण्याची मागणी केली. त्या काळात चार माणसांच्या कुटुंबाला प्रति आठवडा साडेसतरा किलो धान्य द्यावयास हवे अशी त्याची मागणी होती. या मागणीमुळे दुष्काळी परिस्थितीत अन्नधान्याच्या उपलब्धतेची शाश्वती मिळून ग्रामीण मजुरांना महागाईला तोंड देता आले.

स्त्री मजुरांना स्वत:च्या प्रश्नांभोवती संघटित करायला या सर्व प्रयत्नांचा फायदा झाला. ट्रेझ (१९९५) व ओमव्हेट (१९७७) सारख्या अभ्यासकांनी नोंदवले आहे की परिषदेने आयोजलेल्या सभा, बैठका, निदर्शने व निषेध मोर्च्यांना हजर राहिलेल्या ग्रामीण स्त्रियांची दुष्काळ निवारण केंद्रांवर जहाल राजकीय जाणिवेशी ओळख झाली. ओमव्हेटांच्या निरीक्षणानुसार दुष्काळ निवारण केंद्रांवर मोठ्या प्रमाणात ग्रामीण गरीब एकत्रित येऊन त्यांच्या सामूहिक कार्यानुभवामुळे तिच्या वर्गीय जाणिवेला धार मिळाली. शेतकरी व शेतमजुरांच्या लढ्यात स्त्रिया तर नेहमीच सहभागी असायच्या; परंतु परिषदेसारख्या कृतिगटांमुळे 'स्त्रीप्रश्न' प्रखरपणे पुढे आला, असे ओमव्हेटांचे मत आहे.

मी तपासलेले दस्तावेज वरील विश्लेषणास दुजोरा देतात. स्वत:च्या प्रश्नांभोवती स्त्रिया वेगळ्या बैठका घेऊ लागल्या. अशा दोन बैठकांचा विस्तृत वृत्तांत *ग्रामीण श्रमिक* मध्ये सापडतो. नोव्हेंबर १९, १९७२ रोजी भरलेल्या राज्यस्तरीय पहिल्या अधिवेशनात एक हजार स्त्रिया सहभागी झाल्या होत्या. दुसरी सभा एप्रिल १३, १९७३ रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा येथे भरली होती व यात अडीच हजार स्त्रियांसोबत मुंबईहून काही महिला कामगार नेत्याही सहभागी झाल्या होत्या. दुष्काळ निवारण केंद्रांवरती पिण्याच्या पाण्याची, स्वच्छता, पाळणाघरांची सुविधा व स्त्रियांमधील संघटनात्मक बांधिलकीचे महत्त्व या विषयांवर उपस्थितांनी चर्चा केली. संबंधित वृत्तांत मराठा-कुणबी स्त्रियांसहित ग्रामीण स्त्रियांमधील सामूहिक जाणिवेत भर पडत असल्याची ग्वाही देतात.

स्त्री मजुरांनी आपल्या लढ्यांसाठी नव्या पद्धती आखायला सुरुवात केली. एके ठिकाणी वेळेवर समान वेतन देण्यासाठी व निवारणाची आणखी केंद्रे उघडण्यासाठी त्यांनी गटविकास अधिकारी व जिल्हाधिकाऱ्याला घेराव घातला [ओमव्हेट १९७७; लाल निशाण पक्ष व परिषदेचे कार्यकर्ते तसेच भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या मालिनीबाई तुळपुळे यांच्या मुलाखती]. त्यांनी रस्त्यांवरील वाहतूक तसेच रेल्वेसुद्धा अडविली; हेच तंत्र नंतर मुंबईतील स्त्रियांनी महागाईविरोधी आंदोलनात वापरल्याचे दिसून येते [सेन १९९०].

महत्त्वाचे म्हणजे, परिषदेच्या लढ्यांमध्ये उच्चजातीय मराठा स्त्रियांसोबत निम्न जातींतील व अल्पसंख्याक समुदायातील स्त्रियाही आक्रमकरीत्या आपले हक्क सांगू लागल्या. उस्मानाबाद जिल्ह्यातील एका जाहीर सभेत एक हजार लोकांच्या साक्षीने दोन महिलांनी (एक दलित व दुसरी मुस्लीम) मंचावर जाऊन मंत्र्याच्या हातातील माईक हिसकावून, सरकारच्या दुष्काळ निवारण धोरणाबद्दल जाब विचारला (*ग्रामीण श्रमिक*, मे १०, १९७३).

ओमव्हेट (१९७७) कळवतात की दुष्काळ निवारण लढ्यात सर्व जातींतील स्त्रियांच्या सहभागामुळे परिषदेचे कार्यकर्ते स्त्रियांच्या प्रश्नाबाबत जागरूक बनले. लाल निशाण पक्षाच्या लिलाताई भोसले कथन करतात,

> आम्ही स्त्री म्हणून स्त्रियांच्या प्रश्नांकडे कधीच पाहिले नव्हते. परंतु दुष्काळाच्या दिवसांत जेंव्हा स्त्रियांनी समान वेतन व समान कामासाठी लढे दिले तेंव्हा आम्हांला कळले की स्त्रिया मोठ्या संख्येने [लढ्यात] सहभागी होऊ शकतात [ओमव्हेट १९७५:४७].

मुख्य म्हणजे, परिषदेला जमीनधारक मराठा कुळातील स्त्रियांना राजकीय कृतीसाठी प्रवृत्त करता आले. परिषदेच्या संघटन प्रक्रियेतून स्त्रियांना विषम वागणूक देणाऱ्या पद्धतींना लक्ष्य बनवून त्याविरुद्ध स्त्रियांना संघटित करण्यात आले. परिषदेने स्त्रियांच्या 'व्यावहारिक' व 'व्यूहरचनात्मक' अशा दोन्ही हितसंबंधांना प्राधान्य दिले. काळांतराने स्त्रियांनी नेतृत्वाची धुरा सांभाळून प्रतिकाराच्या नव्या पद्धती शोधल्या, ज्या कालौघात भारतातील स्त्री चळवळीचा हिस्सा बनल्या.

## २

१९७०-७१च्या अवर्षणामुळे उपासमारी ओढवलेल्या धुळे जिल्ह्यातील काही आदिवासींनी जमीनदारांकडे धान्य मागितले असता, जमीनदारांच्या खाजगी सेनांनी त्यांच्यावर गोळीबार केला, ज्यात एक आदिवासी मरण पावला व अनेक जखमी झाले. या घटनेने पिळवटून निघालेल्या अंबर सिंह[४] या स्थानिक कार्यकर्त्याने जानेवारी ३०, १९७२ रोजी एक अधिवेशन भरवून 'भूमी मुक्ती'चे आंदोलन सुरू केले. या अधिवेशनाला मुंबई-पुण्याहून अनेक डावे कार्यकर्ते हजर होते. जुलै १९७२ मध्ये या कार्यकर्त्यांनी अंबर सिंहच्या सहकार्याने 'श्रमिक संघटना' स्थापन केले. संघटनेने दुष्काळासाठी जमीनमालकीतील विषमतेला कारणीभूत धरले व दुष्काळाचा प्रतिबंध करण्यासाठी जमीन सुधारणा कायद्याची मागणी केली. तसेच, त्यांनी जंगल जमीन व नापिक जमिनींवर हक्क सांगण्यासाठी व आदिवासींनी गमावलेल्या जमिनी परत मिळविण्यासाठी आदिवासींना संघटित केले. फक्त जनचळवळच आदिवासींना बिगर-आदिवासी जमीनदार व सावकारांच्या पाशातून मुक्त करेल, अशी त्यांची धारणा होती [ब्रह्मे व उपाध्याय १९७९, २००४].

१९७१च्या जनगणेनुसार भिल्ल आदिवासींची ३७ टक्के लोकसंख्या असलेल्या धुळे जिल्ह्यातील शहादा, तळोदा, नंदूरबार तालुक्यांत श्रमिक संघटनेने आपले पाय रोवले. गरिबी व बिगर-आदिवासी जमीनदारांनी केलेल्या अत्यंतिक शोषणामुळे तेथील आदिवासी कर्जबाजारी होऊन त्यांनी त्यांच्या जमिनी गमावल्या.[५]

पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांत जमीन सुधारणेमळे लहान व मध्यम शेतकऱ्यांना जमिनी तरी मिळाल्या; परंतु धुळे जिल्ह्यात तसे काहीच न होता, १९५१-१९७१ या दरम्यान धनाढ्य जमीनदारांचे त्यांच्या जमिनींवरचे हक्क शाबूत तर राहिलेच, तसेच त्यांनी जमीन सुधारणा कायद्यातील नियम धाब्यावर बसवून आदिवासींच्या जमिनी बळकावल्या.

अधिकतर जमीनदार पाटील व गुजर जातींतील होते. ते वाणी, व्यापारी व दारू विक्रेतेही होते. त्यांच्या हातचलाखीमुळे आदिवासी स्वत:च्याच जमिनींवर शेतमजूर बनले. सरकारनेही आदिवासींचा पारंपरिक हक्क असलेल्या जंगल जमिनीला 'आरक्षित व संरक्षित' जंगलांमध्ये परिवर्तित करून आदिवासींना त्यात मज्जाव केला.

परिषदेच्या पश्चिम महाराष्ट्रातील व संघटनेच्या आदिवासी प्रदेशांतील कामांत, संघटन प्रक्रियेत, विचारसरणीत तसेच त्यांनी संघटित केलेले लोकसमूह व त्या त्या प्रदेशांतील जमीनसंबंधांत फरक आढळून येतो. अवर्षणामुळे मराठा कुळातील स्त्रिया प्रथमच आंदोलनात उतरल्या, हे आपण वर पाहिलेच. परंतु कमी वेतन, अनियमित काम व कामाचे अनियमित तास अशा प्रकारच्या जमीनदारांच्या शोषणाविरुद्ध शेतमजूर आदिवासी स्त्रियांनी या अगोदरच संघटित लढे दिले होते [परुळेकर १९७२; साठे १९९०]. धुळे व ठाणे जिल्ह्यांतील जमीनदारांविरुद्ध विसाव्या शतकाच्या सुरुवातीला आदिवासी स्त्री-पुरुषांनी दिलेल्या अनेक लढ्यांचे दाखले परुळेकर (१९७२) मध्ये सापडतात. ही पार्श्वभूमी १९७०च्या दशकातील अवर्षण वर्षांत आदिवासी स्त्रियांना संघटित करण्यात प्रेरणादायी ठरली. तसेच, 'उच्चजातीय' हिंदू स्त्रियांपेक्षा आदिवासी स्त्रिया अधिक स्वतंत्र व स्वायत्त राहिल्या आहेत. ओमव्हेटांच्या मते आदिवासी समाजातील मातृसत्ताकतेमुळे तेथील स्त्रियांना लग्नापूर्वी अधिक लैंगिक स्वातंत्र्य व सहचारी निवडण्याची मुभा असे.

> तरीही, या स्त्रिया वर्गीय वर्चस्व व पितृसत्ताकतेखाली भरडलेल्या आढळतात; घरकाम, संगोपन व शेतकाम अशा दुहेरी स्वरूपात वर्गीय शोषण आढळते तर पत्नीच्या मारहाणीतून पितृसत्ताकता अविष्कृत होते [ओमव्हेट १९७५:३५].

आदिवासी स्त्रियांच्या लैंगिक स्वातंत्र्याकडे बिगर-आदिवासी जमीनदार, व्यापारी व सरकारी अधिकाऱ्यांनी वक्र दृष्टीने पाहिले. आर्थिक विवंचनेमुळे आदिवासी स्त्रिया इतरांच्या लैंगिक छळाला बळी पडत. तसेच, दारूचे व्यसन जडलेल्या नवऱ्यांची मारहाणही त्यांना सहन करावी लागे [ब्रह्मे व उपाध्याय १९७९, २००४; साठे १९९०]. दारू पिणे हे आदिवासी स्त्री-पुरुषांमध्ये कधीच निषिद्ध मानले गेले नाही. परंतु, दारूच्या व्यापारीकरणामुळे स्त्रियांवरील कुटुंबांतर्गत हिंसेत वाढ झाल्याचे अभ्यासक नोंदवतात [मुन्शी-साळढाणा १९९५; प्रभू २००२; ब्रह्मे व उपाध्याय १९७९, २००४].

परिषदेप्रमाणेच, संघटनेनेही दुष्काळ निवारण केंद्रांवरील दुरावस्था व स्त्री-पुरुषांच्या वेतनातील असमानतेविरुद्ध आदिवासींना संघटित करायला सुरुवात केली. त्यांनी स्त्री-पुरुषांसाठी वेळेवर समान वेतन, निवारण केंद्रात तसेच रोजगारात वाढ करण्याची मागणी लावून धरतानाच, केंद्रांवरील भ्रष्टाचाराविरुद्धही आवाज उठवला [साठे १९९०]. जमीनदार व अधिकाऱ्यांबरोबर वाटाघाटी करण्यात आदिवासी स्त्रियांचा पुढाकार असे व अशा वेळेस ते त्यांच्या पुरुषांपेक्षाही अधिक निश्चयी असत [मिएस १९७६]. एकदा निवारण केंद्रावरील मजुरांचा प्रतिकार मोडून काढण्यासाठी शेजारच्या गावातून जमाव आला असताना ह्याच आदिवासी स्त्रियांनी काम बंद पाडले [गांधी व शहा १९९२].

छाया दातार व निर्मला साठे यांसारख्या शहरी स्त्रीवादी कार्यकर्त्यांनी आदिवासी स्त्रियांना स्त्रीवादी दृष्टिकोनाचा परिचय करून दिला. आदिवासी स्त्रिया कामाच्या ठिकाणी होणाऱ्या पिळवणुकीबद्दल आत्मविश्वासाने बोलत परंतु घराच्या चार भिंतीआड होणाऱ्या हिंसेविरुद्ध ब्र ही उच्चारत नसत. संघटनेच्या स्त्रीवादी कार्यकर्त्यांनी आदिवासी स्त्रियांच्या अनौपचारिक सभा, बैठका व गटचर्चा घेऊन त्यांना त्यांच्या समस्या मांडण्यास प्रवृत्त करून त्यामागील कारणे समजून घेण्यात मार्गदर्शन केले. सुरुवातीला लैंगिक श्रमविभागणीपुरते सीमित असणारे चर्चाविश्व कालौघात घरातील हिंसेलाही स्पर्श करू लागले. अशा संभाषणांतून कुटुंबांतर्गत हिंसा व शोषणाच्या प्रक्रिया यांतील आंतरसंबंध उलगडत गेले [सवारा व गोठस्कर १९८२; साठे १९९०].

शहाद्यातील आदिवासी स्त्रियांनी आपल्या कवनांत देशी दारूला पुरुषांची 'मोहिनी' म्हणून संबोधिले आहे. परंतु वरील चर्चा प्रसंगातून स्त्रियांना कळून चुकले की दारू ही काही चेटकीण वा लुभावणारी वस्तू नव्हे तर जमीनदारांकडे अधिक कर्जबाजारी होण्याकरिता आदिवासी पुरुषांसाठी जाणीवपूर्वक रचलेला सापळा आहे [गांधी व शहा १९९२]. परिणामी, स्त्रियांनी १९७२ मध्ये दारूविरोधी आंदोलन छेडून जमीनदारांच्या मालकीचे मटके फोडले व स्थानिक दारूच्या अड्ड्यांवर दारुड्यांची अवहेलना करून, आपल्या बायकांना मारणाऱ्यांना हुडकून काढले [सवारा व गोठस्कर १९८२; साठे १९९०]. भुरीबाई या आघाडीच्या आदिवासी स्त्री कार्यकर्तीच्या मते,

> आमचा विरोध दारूला नसून, दारूच्या व्यसनातून अपरिहार्यपणे बायकांना होणाऱ्या मारहाणीला होता [सवारा व गोठस्कर १९८४; १४५].

तसेच, या सभा-बैठकांतून स्त्रीमुक्ती चळवळ, स्त्रीवाद, मुंबईतील संघटित कामगारांची चळवळ व इतर जगातील मुक्ती चळवळींची चर्चा होत असे. या चर्चांतून आदिवासी स्त्रियांना वर्गीय व लिंगभावाधारित शोषणाची ओळख झाली व यातूनच त्यांचे नेतृत्व पुढे आकारास आले.

परिषदेने आपल्या आंदोलनातून कामाच्या ठिकाणी लैंगिक श्रमविभागणीतून होणाऱ्या लिंगभावाधारित भेदभावाला वाचा फोडली. संघटना तर ह्यापेक्षा अनेक पावले पुढे गेली. तिने प्रथमच जमीनधारणा, व्यापारीकरण व लैंगिक शोषण यांतील आंतरसंबंधांची सर्वांगीण चिकित्सा घडवून आणली. शेतीच्या बाजारीकरणामुळे जमीनदार आदिवासींना अधिक कर्जबाजारी बनवून त्यांना दारूच्या

आहारी जाण्यास भाग पाडत. यातून कुटुंबांतगत हिंसेत वाढ होऊन लैंगिक शोषणास चालना मिळे. अगरवाल (१९८९, १९९४) यांनी दाखवून दिल्याप्रमाणे घरातील लिंगभावाधारित भेदभाव व हिंसा आर्थिक संरचनांपासून विलग करून समजून घेता येत नाहीत. श्रमिक संघटनेचे कार्य या दोन वास्तवांतील नातेसंबंध अधोरेखित करते. १९९०च्या दशकात दारूच्या व्यसनातून होणाऱ्या कुटुंबांतर्गत हिंसेविरुद्ध स्त्रियांना संघटित करणाऱ्या अनेक महिला संघटनांनी संघटनेच्या कार्यातून प्रेरणा घेतली, हे येथे आवर्जून नोंदवले पाहिजे.

## ३

रोहयो अवर्षणानंतरच्या वर्षांत राबविण्यात आली व १९७८ मध्ये महाराष्ट्र सरकारने रोहयो कायदा पास करून जे कोणी ग्रामीण भागात काम मागेल त्यास रोजगार देणे बंधनकारक केले [देव १९९५]. अनेक जनसंघटनांनी मजुरांना संघटित करण्यासाठी या तरतुदीचा लाभ घेतला. या विभागात मी १९८०च्या दशकाच्या सुरुवातीला सांगली जिल्ह्यातील खानापूर व वाळवा तालुक्यांत व सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यात लहान व मध्यम शेतकऱ्यांना व विस्थापित गिरणी कामगारांना संघटित करणाऱ्या 'मुक्ती संघर्ष' या संघटनेच्या कार्याची दखल घेतली आहे.

मागोवा व नंतर श्रमिक संघटनेशी निगडित असलेले भारत पाटणकर यांनी १९७०च्या अखेरीस श्रमिक संघटनेच्या विघटनानंतर १९८० मध्ये 'श्रमिक मुक्ती दल' स्थापन केला. १९८२ मध्ये भारत पाटणकर, इंदूताई पाटणकर, गेल ओमव्हेट, जयंत निकम, नागमणी राव व के. जे. जॉय यांनी 'मुक्ती संघर्ष' स्थापून दक्षिण महाराष्ट्रातील जिल्हे आपले कार्यक्षेत्र म्हणून निर्धारित केले. सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्हे हे पाण्याच्या उपलब्धतेतील विषमतेबद्दल विख्यात आहेत. या जिल्ह्यांतील काही भाग ओलिताखाली असता, इतर भागांत मात्र पाण्याची सदैव टंचाई जाणवते [ओमव्हेट १९९३]. पर्जन्यातील व शेतजमिनीच्या दर्जातील तफावतीमुळे सांगली जिल्हा दोन प्रमुख भौगोलिक पट्ट्यांत विभागला आहे — सुपीक मध्यभाग व अवर्षणग्रस्त पूर्वभाग. जिल्ह्यातील अधिकतर शेती मराठा जातींतील लहान व मध्यम शेतकऱ्यांच्या मालकीची आहे.[६]

१९८२ मध्ये मुक्ती संघर्षने रोहयोअंतर्गत शेतकऱ्यांचे संघटन करण्यास सुरुवात केली, तेंव्हा सांगली जिल्हा तीव्र अवर्षणाचा सामना करत होता. तसेच, मुंबईतील १९८२-८४च्या गिरणी कामगारांच्या संपामुळे जवळपास अडीच लाख कामगार विस्थापित होऊन रोजगाराच्या शोधात गावी परतले [बक्षी १९८६] व त्यातील काही सांगली जिल्ह्यातील होते.

अवर्षण व बेरोजगारीमुळे हे विस्थापित कामगार व स्त्रिया रोहयोच्या कामांची मागणी धरू लागले. परिषद व संघटनेप्रमाणेच मुक्ती संघर्षनेसुद्धा १९८२-८४ मध्ये सांगली जिल्ह्यातील विविध ठिकाणी मोर्चे-धरणे धरून भ्रष्टाचार व वेळेवर समान वेतनाचे मुद्दे उपस्थित करून रोहयो कायद्यातील तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी आग्रह धरला. मुक्ती संघर्षच्या मते भारतीय समाजातील शोषण वर्ग, पितृसत्ताकता, संस्कृती व पर्यावरणाशी संबंधित असल्यामुळे त्यांनी रोहयोच्या प्रकल्प स्थळांवर व घराघरांतून सभा-बैठका व चर्चा घडवून स्त्रियांना या योजनेअंतर्गत त्यांना प्राप्त असलेल्या विशेषाधिकारांची जाण करून दिली.

मुक्ती संघर्षच्या तीन मागण्यांची येथे चर्चा केली आहे. पहिली मागणी दुष्काळ निवारण व संतुलित कृषी विकास यांची सांगड घालण्याबाबत होती. दुसरी मागणी रोहयोअंतर्गत उत्पादक कामांची निवड लोकांनी करून रोहयो लोकशाही तत्त्वांनुसार राबविली जावी ह्या उद्देशाशी निगडित होती. तिसरी मागणी, सासर व माहेरच्या मंडळींनी वाळीत टाकलेल्या परितक्त्यांविषयी होती. नवरा-बायको यांच्या जोडीला प्राधान्य देणाऱ्या रोहयोच्या तरतुदींमध्ये बदल आणून परितक्त्यांसारख्या एकट्या स्त्रियांविषयीचा भेदभाव नाहीसा करणे व त्यांना निवासाचा अधिकार मिळवून देणे, हा त्यामागील हेतू होता.

सांगली जिल्ह्यातील रोहयोची अधिकतर कामं रस्ते बांधणीची असायची. मुक्ती संघर्षने 'खडी आम्ही फोडणार नाही, रस्ता आम्ही खणणार नाही, दुष्काळ घालवल्याशिवाय राहणार नाही' या घोषणेभोवती मजुरांना संघटित करून, खडी फोडून व रस्ते बांधून उत्पादक मत्तांची निर्मिती होत नाही, अशी भूमिका घेतली. उलट, जमिनीचा कस व पाण्याच्या प्रश्नाकडे लक्ष देऊन दुष्काळ निवारणाच्या सर्वांगीण कार्यक्रमाची गरज तिने प्रतिपादली [ओमव्हेट १९९३].

पाण्याचा प्रश्न प्रादेशिक स्तरावर सोडविण्याचे प्रयत्न सुरू झाले. भूजलाची क्षमता जाणून घेण्यासाठी जिल्ह्यातील नदी व विहिरींचे सर्वेक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना व शेतमजुरांना सहभागी करून घेतले गेले. सरकारने रोहयोअंतर्गत लहान बंधारे व पाझर तलाव बांधण्यास प्राधान्य द्यावे, जेणेकरून शेतजमिनीचा कस वाढण्यास व पाण्याचा शाश्वत पुरवठा होण्यास मदत होईल असे मुक्ती संघर्षचे म्हणणे होते. 'बळीराजा' धरणाच्या बांधकामातून सार्वजनिक सहभागातून पर्यावरणीय संतुलन साधून दुष्काळ निवारण साधण्याचा प्रयत्न झाला. रोहयोअंतर्गत लहान धरणांची कामे घेऊन नापीक जमिनींना कसणुकीयोग्य करण्याचा प्रयत्न झाला. लोकांच्या गरजेनुसार कामांची निवड होण्याने सार्वजनिक बांधकामाच्या संकल्पनेलाच कलाटणी मिळाली. विभिन्न पर्यावरणीय परिस्थितींनुसार वेगवेगळ्या प्रदेशांत निरनिराळी सार्वजनिक बांधकामं हाती घ्यावीत असा ह्या मागणीचा रोख होता.

पर्यायी स्थायी विकासाचे प्रारूप राबवताना मुक्ती संघर्षच्या कार्यकर्त्यांना विधवा, त्यागलेल्या, अविवाहित व विस्फोटित महिलांच्या समस्येची जाणीव झाली. रोहयो नियमानुसार नवरा-बायकोच्या जोडीला रोजगार दिला जात असल्यामुळे पुरुषसोबतीच्या अभावी परितक्त्या स्त्रियांवर अशा कामांपासून वंचित राहण्याची पाळी येत असे. अशा परिस्थितीत अधिकाऱ्यांनी दोन महिलांच्या जोडीला मान्यता द्यावी यासाठी मुक्ती संघर्षने आग्रह धरला. स्त्रियांच्या प्रश्नांवर वेगळ्या स्वायत्त स्त्री संघटना स्थापण्याऐवजी जनसंघटना अंतर्गतच स्त्रियांच्या प्रश्नांना हाताळणारे खास कक्ष सुरू करण्यावर भर देऊन, १९८५ मध्ये 'स्त्री मुक्ती संघर्ष'ची (SMS)

स्थापना झाली [ओमव्हेट १९९३]. मराठा जातीतील व निम्न वर्गातील स्त्रियांच्या अभिव्यक्तीसाठी संघटनेअंतर्गत असा वेगळा कक्ष असणे आवश्यक होते.

आरंभी, SMSचे काम सांगली जिल्ह्यातील तासगाव व वाळवा तालुक्यांत, सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यात व कोल्हापूर व सोलापूर जिल्ह्यांतील काही भागांत सुरू झाले. स्त्रीवादी जाणीव जागृत करण्यासाठी आयोजित केलेल्या तिच्या सभा-बैठकांमध्ये पुरुषांचा मोठ्या संख्येने सहभाग असे; तसेच, अशा शिबिरांत पुरुषांना स्वयंपाक करावयास लावून प्रस्थापित लैंगिक श्रमविभागणीला नकार देण्यात आला.

SMSच्या वाटचालीत परितक्त्या स्त्रियांचा प्रश्न महत्त्वाचा ठरला. संघटेनच्या कार्यक्षेत्रातील गावांच्या सर्वेक्षणातून १६ ते ५० वयोगटातील परितक्त्य स्त्रियांची मोठी संख्या (प्रत्येक गावात किमान ५० परितक्त्या) आढळून आली. सासर व माहेर या दोहोने झिडकारलेल्या या स्त्रियांना विवाहित स्त्रियांसारखे नातेसंबंधांचे आधार व हक्क नसल्यामुळे त्यांना सामाजिक कुचेष्टेला सामोरे जावे लागे [SMS फाईल्स]. तेंव्हापासून अनेक स्त्री संघटनांनी ग्रामीण भारतातील एकट्या व वाळीत टाकलेल्या स्त्रियांच्या संख्येतील वाढ व त्याचा घरकुलांवर होणारा परिणाम जाणून घेण्याचा प्रयत्न केला. भारत सरकार पुरस्कृत असंघटित क्षेत्रातील स्वयंरोजगार महिलांवरील 'श्रमशक्ती' अहवालात ग्रामीण भारतात स्त्रीप्रमुख असलेली ३३ टक्के घरटी नोंदवली गेली.

परितक्त्यांच्या प्रश्नाला मुखरित करण्यासाठी SMSने सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील विटा गावी एक अधिवेशन भरवून अनेक स्त्री संघटनांच्या सहभागातून परितक्त्यांच्या जीवननिर्वाह, रेशन कार्ड व घरवाडी जमिनीच्या मुद्यांना हात घातला. ग्रामीण भागातील स्त्रियांच्या नावावर कोणतीच मालमत्ता नसल्यामुळे परितक्त्यांच्या मागणीसाठी कायद्यांमध्ये व त्यांच्या अंमलबजावणीमध्ये बदल घडवून आणणे आवश्यक बनले.

या अधिवेशनानंतर फेब्रुवारी ९, १९८९ रोजी सांगली जिल्ह्यातील ३६ गावांतील ३०० परितक्त्यांची जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शनं भरवून सरकारी योजनेअंतर्गत सरकारने या स्त्रियांच्या आवासाकरता गावठाण जमिनीतील दोन गुंठा जमीन त्यांच्या नावे करण्याची मागणी करण्यात आली. सरकारने या प्रस्तावाला मंजुरी दिली व सांगली जिल्ह्यातील बाहे गावातील २३ स्त्रियांना घरवाडीचे हक्क देण्यात आले. परंतु स्थानिक नोकरशाहीने जमिनीचे पट्टे देण्यास नकार दिल्यावर १९८९ मध्ये त्याविरुद्ध खटला दाखल करण्यात आला. तेरा वर्षांच्या प्रदीर्घ लढ्यानंतर मे २००३ मध्ये उच्च न्यायालयाने SMSच्या बाजूने निकाल दिला. या अर्थी, SMSचे कार्यक्षेत्र फक्त ग्रामीण स्त्रियांच्या जीवननिर्वाहापुरते सीमित नव्हते तर परितक्त्यांसारख्या 'बेवारशी' स्त्रियांच्या सुरक्षेचा हक्कही तिने मिळवून दिला.

तरीही, एकट्या स्त्रियांचे हक्क हे 'मुक्ती संघर्ष'च्या पर्यावरणीय संतुलनावर बेतलेल्या कृषी-औद्योगिक उत्पादनाच्या कार्यक्रमापासून विलग करून पाहता येत नाहीत. नागमणी राव यांच्या शब्दांत

> जेंव्हा स्त्री मुक्ती संघर्षने रोहयोद्वारा उपजीविकेचे प्रश्न हाती घेतले तेंव्हा आमच्या शहरी स्त्रीवादी भगिनींनी आमचा एकूण दृष्टिकोन निव्वळ अर्थवादी असल्याचा व स्त्रियांना आम्ही केवळ एक आर्थिक घटक म्हणून पाहात असल्याने आम्ही पर्याप्त प्रमाणात स्त्रीवादी नसल्याचे आरोप केले (मुलाखत, फेब्रुवारी १२, २००३).

म्हणूनच, जेंव्हा मुक्ती संघर्ष व SMSने रोहयोअंतर्गत समान वेतन व स्त्रियांच्या रोजगार हक्कांसारख्या व्यावहारिक हितांवर लक्ष केंद्रित केले तेंव्हाच त्यांनी संतुलित कृषिपद्धतींसोबत स्त्रियांना राजकीय सत्ता व जमीन व मालमत्तेत हक्क मिळवून देण्याचा सर्वसमावेशक कार्यक्रमही लावून धरला.

रोहयोतील स्त्रियांच्या मोठ्या सहभागामुळे या योजनेला 'स्त्री सन्मुख' म्हंटल जातं. परंतु मी या वस्तुस्थितीकडे 'गरिबीच्या स्त्रीयीकरणा'च्या संदर्भात पाहते. पुरुषांपेक्षा कमी साधनं, मत्ता, कौशल्ये, रोजगार संधी, शिक्षण व वित्तीय संसाधनं असल्यामुळे, साहजिकच गरिबांमध्ये स्त्रियांचे प्रमाण अत्याधिक आहे. UNIFEM (१९९५) नुसार जगातील गरिबांपैकी किमान ६० टक्के स्त्रिया आहेत. घरापासून बाजारपेठेपर्यंत स्त्रियांना अनेक आडकाठ्यांना सामोरे जावे लागत असल्यामुळे त्यांच्या उत्पन्नाच्या संधी कमी राहून त्यांच्या श्रमाला कमी मोबदला मिळतो.

ग्रामीण महाराष्ट्रातील १२.७ दशलक्ष स्त्री कामगारांपैकी ८९ टक्के (४१ टक्के शतकरी व ४८ टक्के शेतमजूर) स्त्रिया शेतीव्यवसायात आहेत [कृष्णराज व इतर २००४]. अधिकतर स्त्रियांच्या वाट्याला दुय्यम, असुरक्षित व अस्थायी कामं येतात. अशा परिस्थितीत, त्या रोहयोसारख्या योजनांतील अल्पकालीन अकुशल रोजगार स्वीकारतात. म्हणजेच, स्त्रियांना श्रमबाजारात उत्पन्नक्षम काम मिळत नसल्यामुळे त्या मोठ्या संख्येने रोहयोवर रुजू होताना दिसतात. या अर्थी, रोहयो ही 'स्त्री सन्मुख' आहे असे म्हणण्यापेक्षा, एकूण विकास प्रक्रियेत लिंगभावसंबंधित मुद्यांना अग्रक्रम नाही असेच म्हणणे अधिक योग्य ठरेल. थोडक्यात, डाव्या व स्त्रीवादी संघटनांना रोजगार हमीभोवती स्त्रियांना संघटित करण्याचा अवकाश उपलब्ध करून, नव्या स्त्रीवादी जाणिवा अभिव्यक्त होण्यास मदत केली, येथवरच रोहयोस 'स्त्री सन्मुख' मानता येईल.

टीपा :

१) रोहयो कायदा रोजगाराची हमी देतो; कामाची मागणी करताच शासनाने रोजगार पुरवावयास हवा व कार्यस्थळी स्त्री व पुरुषांना समान दाम, पाळणाघरे, पिण्याच्या पाण्याची व स्वच्छतेची सुविधा यासारख्या तरतुदी कायद्यामध्ये समाविष्ट आहेत.

२) या अभ्यासकांच्या मते या तरतुदी फक्त रोजयो कायद्यातच समाविष्ट आहेत. परंतु, या तरतुदी सर्वप्रथम १८९३च्या दुष्काळावरील उपाययोजनांत आढळतात. त्यानंतरच्या भारतातील सर्व दुष्काळ निवारण कार्यक्रमांत त्या समाविष्ट करण्यात आल्या.

३) ओमव्हेट अवर्षण वर्षातील परिषदेच्या लढ्यांमध्ये सहभागी होत्या. १९७०-७१ व १९७३च्या अवर्षणांत ओमव्हेट त्यांच्या संशोधनानिमित्त क्षेत्रकार्य करीत होत्या व ग्रामीण स्त्री-पुरुषांच्या लढ्याला साक्षी होत्या.

४) सर्वोदयवाद्यांनी आदिवासींतील भूमिहीनता, कर्जबाजारीपणा व त्यांच्या जमिनीचे होणारे हरण याची दखल न घेतल्यामुळे, सर्वोदय विचारसरणीबद्दल भ्रमनिरास होऊन अंबर सिंह या सुशिक्षित आदिवासी नेत्याने १९६९ मध्ये आदिवासी सेवा मंडळ स्थापिले.

५) ब्रह्मे व उपाध्याय (१९७९) नुसार १९७०-७१ मध्ये राज्यातील सरकारी प्रकल्पांसाठी ४५४० आदिवासी कुटुंबांची २०,०६० एकर जमीन ताब्यात घेण्यात आली.

६) १९८१ मध्ये २ ते १० हेक्टर जमीनमालकी असलेल्या लहान व मध्यम शेतकऱ्यांचे प्रमाण ३५ टक्के होते व एकूण शेतीजमिनीपैकी ५७.१ टक्के जमीन त्यांच्या मालकीची होती.

संदर्भ :


अगरवाल, बीना (१९८९) : 'रुरल वुमेन, पावर्टी अँड नॅचरल रिसोर्सेस — सस्टेनन्स, सस्टेनेबिलिटी अँड स्ट्रगल फॉर चेंज', *इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल वीकली*, ऑक्टोबर २८.

– " – (१९९४) : *अ फील्ड ऑफ वन्स ओन — जेंडर अँड लँड राईटस् इन साऊथ एशिया*, केंब्रीज युनिव्हर्सिटी प्रेस, केंब्रीज.

आचार्य, सारथी (१९९०) : *एम्प्लॉयमेंट गॅरंटी स्कीम — इम्पॅक्ट ऑन मेल अँड फिमेल लेबर*, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशियल सायन्सेस, मुंबई.

ओमव्हेट, गेल (१९९३) : *रिइनव्हेंटिंग रिव्होल्यूशन — न्यू सोशियल मुव्हमेंटस् अँड सोशालिस्ट ट्रॅडिशन इन इंडिया*, एम. इ. शार्प/ईस्ट गेट बुक, न्यू यॉर्क.

– " – (१९७७) : 'वुमेन अँड रुरल रिव्होल्ट इन इंडिया — १', *सोशियल सायन्टीस्ट*, खंड ६, अंक १.

– " – (१९७७) : 'वुमेन अँड रुरल रिव्होल्ट इन इंडिया — २', *सोशियल सायन्टीस्ट*, खंड ६, अंक २.

– " – (१९७५) : 'रुरल ओरिजिन्स ऑफ वुमेन्स लिबरेशन इन इंडिया', *सोशियल सायन्टीस्ट*, खंड ४, अंक ४-५.

कुमार, राधा (१९९३) : *द हिस्ट्री ऑफ डुईंग*, काली फॉर वुमेन, नवी दिल्ली.

कृष्णराज, मैत्रयी (२००४) : 'डज EGS रिक्वायर रिस्ट्रक्चरिंग फॉर पावर्टी अलिव्हिएशन अँड जेंडर इक्वालिटी? — जेंडर कन्सर्नस अँड इश्यूज फॉर रिस्ट्रक्चरिंग', *इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल वीकली*, खंड ३९, अंक १७, एप्रिल २४.

– " – व इतर (२००४) : 'डज EGS रिक्वायर रिस्ट्रक्चरिंग फॉर पावर्टी अलिव्हिएशन अँड जेंडर इक्वालिटी? — कन्सेप्ट, डिझाइन अँड डेलिव्हरी सिस्टिम', *इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल वीकली*, खंड ३९, अंक १६, एप्रिल १७.

गांधी, नंदिता व नंदिता शहा (१९९२) : *द इश्यूज अॅट स्टेक : थिअरी अँड प्रॅक्टीस इन कॉन्टेम्परी वुमेन्स मुव्हमेंट इन इंडिया*, काली फॉर वुमेन, नवी दिल्ली.

दातार, छाया (१९९०) : 'बिडी वर्कर्स ऑफ निपाणी', इलिना सेन (संपा.) *अ स्पेस विदिन स्ट्रगल*, काली फॉर वुमेन, नवी दिल्ली.

– " – (१९८७) : *स्टेटस ऑफ वुमेन्स एम्प्लॉयमेंट — रि-इव्हॅल्युएटिंग EGS इन महाराष्ट्र : इटस् इम्पॅक्ट ऑन वुमेन वर्कर्स*, इन्स्टिट्यूट ऑफ सोशिअल स्टडीज, नवी दिल्ली.

दांडेकर, कुमुदिनी (१९८३) : *EGS — ॲन एम्प्लॉयमेंट फॉर वुमेन*, गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स, पुणे.

– " – व मंजू साठे (१९८०) : 'एम्लॉयमेंट गॅरंटी स्कीम अँड फूड फॉर वर्क प्रोग्रॅम', *इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल वीकली*, खंड १५, अंक १५, एप्रिल १२.

देव, महेंद्र (१९९५) : 'अलिव्हिएटिंग पावर्टी — महाराष्ट्र एम्प्लॉयमेंट गॅरंटी स्कीम', *इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल वीकली*, खंड ३०.

ड्रेझ, ज्याँ, अमर्त्य सेन व अबिद हुसैन (संपा.) (१९९९) : *द पॉलिटिकल इकॉनॉमी ऑफ हंगर*, ओ.यु.पी., ऑक्सफर्ड.

परुळेकर, गोदावरी (१९७२) : *जेंव्हा माणूस जागा होतो*, मौज, मुंबई.

प्रभू, प्रदीप (२००२) : 'लँड ॲलिनिएशन, लँड रिफॉर्मस् अँड ट्रायबल्स इन महाराष्ट्र', घनश्याम शहा व डी. सी. साह (संपा.) *लँड रिफॉर्मस् इन इंडिया — परफॉर्मन्स अँड चॅलेंजिस इन गुजराथ अँड महाराष्ट्र*, सेज पब्लिकेशन्स, नवी दिल्ली.

बक्षी, आर. (१९८६) : *द लाँग हॉल*, बिल्ड डॉक्युमेंटेशन सेंटर, मुंबई.

ब्रह्मे, सुलभा व अशोक उपाध्याय (२००४) : *अग्रेरियन स्ट्रक्चर, मुव्हमेंटस् अँड पिझंट ऑर्गनायझेशन्स इन इंडिया — महाराष्ट्र, खंड २*, व्ही. व्ही. गिरी नॅशनल लेबर इन्स्टिट्यूट, नॉयडा, उत्तर प्रदेश व मानक पब्लिकेशन्स, नवी दिल्ली.

– " – (१९७९) : *अ क्रिटिकल ॲनॅलिसीस ऑफ द सोशियल फॉर्मेशन अँड पिझंट रजिस्टन्स इन महाराष्ट्र*, शंकर ब्रह्मे समाज विज्ञान ग्रंथालय, पुणे.

मिएस, मारिया (१९७६) : 'द शहादा मुव्हमेंट — अ पिझंट मुव्हमेंट इन महाराष्ट्र, इटस् डेव्हलपमेंट अँड इटस् परस्पेक्टीव्ह', *जर्नल ऑफ पिझंट स्टडीज*, ३(४), पृ. ४७८-४९६.

मुन्शी-सालढाणा, इंदिरा (२०००) : 'कलोनियल फॉरेस्ट रेग्युलेशन अँड कलेक्टीव्ह रजिस्टन्स — नाईन्टींथ सेंच्यूरी ठाणे डिस्ट्रिक्ट', आर. रोव्ह, व्ही. दामोदरन व एस. संगम (संपा.) *नेचर अँड द ओरिएंट — द एनव्हिरॉनमेंटल हिस्ट्री ऑफ साऊथ अँड साऊथ ईस्ट एशिया*, ओ.यु.पी., ऑक्सफर्ड.

मोझर, सी. (१९८९) : 'जेंडर प्लॅनिंग इन द थर्ड वर्ल्ड — मिटिंग प्रॅक्टीकल अँड स्ट्रॅटेजिक जेंडर नीड्स', *वर्ल्ड डेव्हलपमेंट*, १७(११), पृ. १७९९-१८२५.

UNIFEM (१९९५) : 'द इव्हॅपोरेशन ऑफ पॉलिसिज फॉर वुमेन्स ॲडव्हान्समेंट', *अ कमिटमेंट टू द वर्ल्डस् वुमेन*.

लॅडेजिनस्की, डब्ल्यू. (१९७३) : 'ड्रॉट इन महाराष्ट्र : नॉट इन अ हंड्रेड इयर्स', *इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल वीकली*, खंड ८, अंक ७, पृ. ३८३-३९६.

सवारा, मीरा व सुजाता गोठस्कर (१९८५) : 'ॲन ॲसर्शन ऑफ वुमेन पॉवर — ऑर्गनायझिंग लँडलेस वुमेन इन महाराष्ट्र', मधु किश्वर व रूथ वनिथा (संपा.) *इन सर्च ऑफ ॲन्सर्स — इंडियन वुमेन्स व्हॉयसिस फ्रॉम* मानुषी', झेड, लंडन.

साठे, निर्मला (१९९०) : 'द आदिवासी स्ट्रगल इन धुलिया डिस्ट्रिक्ट', इलिना सेन (संपा.) *अ स्पेस विदिन द स्ट्रगल*, काली फॉर वुमेन, नवी दिल्ली.

सुब्रह्मण्यम्, व्ही. (१९७५) : *पार्चड् अर्थ — द महाराष्ट्र ड्रॉट, १९७०-७३*, ओरिएंट लाँगमन लिमिटेड, मुंबई.

सेन, इलिना (संपा.) (१९९०) : *अ स्पेस विदिन द स्ट्रगल*, काली फॉर वुमेन, नवी दिल्ली.

हेरिंग, आर. व आर. एडव्हर्डस् (१९८३) : 'गॅरंटिंग एम्प्लॉयमेंट टू द रुरल पुअर — सोशियल फंक्शन्स अँड क्लास इंटरेस्टस् इन द एम्प्लॉयमेंट गॅरंटी स्कीम ऑफ वेस्टर्न इंडिया', *वर्ल्ड डेव्हलपमेंट*, ११(७), पृ. ५७५-५९२.


नप्रप


anurekha@unipune.ernet.in


[वरील लेख लेखिकेचा 'गॅरंटीड एम्लॉयमेंट अँड जेंडर कनस्ट्रक्शन : वुमेन्स मोबिलायझेशन्स इन महाराष्ट्र' या इंग्रजीतील लेखाचा (*इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल वीकली*, डिसेंबर १६-२२, २००६) अनुवाद आहे.]